सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपद्धती.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन शुद्धीपत्रक क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २७ नोव्हेंबर, २०१७.

वाचा :- १) शासन परिपत्रक समक्रमांक दि.२५.०१.२०१७
२) शासन पत्र समक्रमांक दि.२७.०२.२०१७
३) शासन शुद्धिपत्रक समक्रमांक दि.२८.०८.२०१७
४) शासन शुद्धिपत्रक समक्रमांक दि.२७.०९.२०१७.

प्रस्तावना :-

शासन परिपत्रक, दि.२५.०१.२०१७ अन्वये सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याच्या अनुषंगाने अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच शासन शुद्धिपत्रक समक्रमांक दि.२८.०८.२०१७ व दि.२७.०९.२०१७ अन्वये यामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

वरील संदर्भांकित शासन परिपत्रक व शुद्धिपत्रकान्वये निश्चित केलेल्या कार्यपद्धतीनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्गा विभागाअंतर्गत राष्ट्रीय महामार्गाच्या रूंदीकरणाकरीता लागणाऱ्या अतिरिक्त जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने घेण्याच्या अनुषंगाने प्रस्ताव संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयास सादर केले असता सदर प्रस्तावावर कार्यवाही करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर अडचणी येत असल्याने त्यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने सर्वकष विचार करून खालील सुधारणा करण्याचा शासन निर्णय घेत आहे.

शासन शुद्धिपत्रक :-

संदर्भांकित शासन परिपत्रक दि.२५.०१.२०१७ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

(१)जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव दाखल करणे.

संदर्भांकित शासन परिपत्रक दि.२५.०१.२०१७ मधील क्र.(१) अ) मधील -सोबत प्रस्तावाचा विहित नमूना जोडला आहे.॰ च्या पुढे **"जिल्हाधिकारी यांचे स्तरावर प्राप्त प्रस्तावासंदर्भात संबंधित उप विभागीय अधिकारी / उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), भूमी अभिलेख अधिकारी, संबंधीत तहसिलदार, संबंधीत कार्यकारी अभियंता (रा.म.) यांचेसमवेत प्रकरणनिहाय तातडीने आढावा घेण्यात यावा"** असे वाचावे.

(२) जाहीर नोटीस प्रसिध्द करणे.

सदरहू शासन परिपत्रकामधील क्र.(२) अ) च्याऐवजी **" संपादक संस्थेव्दारे सादर केलेल्या प्रस्तावाच्या आधारे उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी प्रादेशिक विभागाच्या /**

प्राधिकरणाच्या / महामंडळाच्या पॅनलवरील वकील अथवा सरकारी वकील यांच्या मान्यतेने जाहीर नोटीस तयार करुन त्यांच्या स्तरावर शासन परिपत्रक, दि.२५.०१.२०१७ मधील क्र.(२) ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे जिल्हा माहिती अधिकारी यांचेमार्फत प्रसिध्द करावी." असे वाचावे.

(४) संयुक्त मोजणी करणे.

सदरहू शासन परिपत्रकामधील क्र.(४) क) मधील -त्यासाठी संबंधीत प्रादेशिक विभाग / प्राधिकरण / महामंडळ यांनी संबंधितांना आगाऊ स्वरूपात लेखी पत्राने कळवावे.◦ **च्याऐवजी "त्यासाठी संबंधीत भूमी अभिलेख कार्यालयाने सर्व संबंधितांना आगाऊ स्वरुपात लेखी पत्राने कळवावे."** असे वाचावे.

तसेच क्र.(४) ड) **च्याऐवजी " भूमी अभिलेख विभागाने त्यांचेकडे प्रस्ताव प्राप्त झाल्यावर २ दिवसांत संयुक्त मोजणी शुल्क तातडीने सविस्तर तपशिलासह (चालान इत्यादीसह) संबंधीत प्रादेशिक विभाग/ प्राधिकरण / महामंडळास कळवावे. संबंधित प्रादेशिक विभाग / प्राधिकरण / महामंडळाने मोजणी शुल्काचा भरणा तातडीने भूमी अभिलेख कार्यालयाकडे करावा. मोजणी शुल्क भरल्यानंतर संयुक्त मोजणीच्या कार्यवाहीबाबत २ दिवसांच्या कालावधीत मोजणी वेळापत्रक भूमी अभिलेख कार्यालयाने संबंधीत संबंधित प्रादेशिक विभाग / प्राधिकरण / महामंडळ / भूसंपादन अधिकारी यांना कळवावे व त्यानुसार भूमी अभिलेख कार्यालयाने संयुक्त मोजणीची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी."** असे वाचावे.

(५) कायदेशीर शोध अहवाल (Legal Search Report)

सदरहू शासन परिपत्रकामधील क्र.(५) अ) **च्याऐवजी "उपविभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी त्यांच्या स्तरावर संबंधित तहसिलदार यांचेकडून खाजगी जमिनीचे सर्व्हे नं./ गट क्र.निहाय गत ३० (तीस) वर्षापासूनचे महसूल अभिलेख (गाव नमुना ७/१२ फेर नोंदी, गट बुक नकाशा ई.) तपशील प्राप्त करावा."** असे वाचावे.

तसेच क्र.(५) ब) **च्याऐवजी "उपविभागीय अधिकारी/ उप जिल्हाधिकारी(भूसंपादन) यांनी खाजगी जमिनीचे सर्व्हे नं./ गट क्र. निहाय गत १५ (पंधरा) वर्षातील नोंदणीकृत दस्ताऐवज यांचा तपशील दुय्यम निबंधक कार्यालयाकडून प्राप्त करावा "** असे वाचावे.

तसेच क्र.(५) क) **च्याऐवजी "उपविभागीय अधिकारी / उप जिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी उक्त अभिलेखावरुन खाजगी जमिनीचा कायदेशीर शोध अहवाल तयार करुन त्यास जिल्हा सरकारी वकील/ पॅनेलवरील विधी सल्लागार यांची मान्यता घ्यावी. यासाठी येणारा खर्च हा संयुक्त खात्यातील भूसंपादनासाठी जमा रकमेतून करण्यात यावा व रक्कम जमा नसेल तर संबधीत भूसंपादन यंत्रणा/ कार्यकारी अभियंता यांनी खर्चाची पूर्तता करुन द्यावी "** असे वाचावे.

तसेच सदर शासन परिपत्रकातील क्र.(१०) च्या नंतर क्र.(११) वर **"संपादक संस्थेकडून खाजगी जमीन थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाने ३ महिन्यांच्या कालावधीत दक्षतेने पूर्ण करावी."** असा मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे.

उर्वरित मजकूरामध्ये कोणताही बदल नाही.

सदर शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०१७११२७१६१३०५२२१९ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Subhash K Gawade

Digitally signed by Subhash K Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=40b8b2876e2135f5b158b877f59754b2a7ddf64e0cf59f2dc33ad60b8bce5bcd, cn=Subhash K Gawade
Date: 2017.11.27 16:16:59 +05'30'

(सु.कि.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. मंत्री (महसूल) / मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. विभागीय आयुक्त, कोकण विभाग / पुणे / नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नागपूर
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
७. सर्व जिल्हाधिकारी
८. सर्व मंत्रालयीन विभाग,
९. कार्यासन (अ-१, अ-३, अ-४)
१०. निवड नस्ती (अ-२)